**<u>सं.फौ.ख.क्र.६०/२०२२ मधील निशाणी १७ आदेश</u>**

साक्षीदार हजर. साक्षीदार शपथेवरती शपथपत्रातील मजकूर त्याच्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर असल्याचे सांगून त्यावर त्याची सही असल्याचे मान्य करतो. करीता, पुराव्याचे शपथपत्र पुराव्याकामी वाचण्यात येते.

**<u>शपथेवरती तक्रारदारतर्फे अतिरीक्त सरतपास विधीज्ञ श्री. अश्पाक शेख यांचे मार्फत</u>**

१४. मला आता नि.क्र.२८/१ व नि.क्र.२८/२ वरील धनादेश दाखविण्यात आले. त्यावर आरोपीच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.सी१/सी.डब्ल्यू १</u>** व **<u>नि.क्र. सी२/सी.डब्ल्यू १</u>** दिली आहे. मला आता नि.क्र.४/७ वरील नोटीस दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र. सी३/सी.डब्ल्यू १</u>** दिली आहे. मला आता नि.क्र.४/८ वरील पोस्टाची पावती पोहोच दाखविण्यात आली. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.सी४/सी.डब्ल्यू १</u>** दिली आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एन.पई यांचे मार्फत</u>**

नि.क्र.२९ वरील आदेशाप्रमाणे **उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही /-

ठिकाण : मालवण
दिनांक : ०६/०५/२०२४

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण